जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# आपत्ती व्यवस्थापनाचे विद्यापीठात धडे

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरात जलआपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणास सुरुवात झाली. राजाराम तलावाच्या परिसरात भगव्या रंगाच्या 'पन्हाळा' चमूला प्रशिक्षण देण्यास राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) जवानांनी सुरुवात केली.

निरीक्षक एस. डी. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी एक वाजेपर्यंत प्रशिक्षण चालले. या प्रशिक्षणामध्ये सुरुवातीला संपूर्ण चमूचे तीन गटांत विभाजन करून त्यांना उपलब्ध साहित्यापासून बचावकार्य करणे, दोर व बॅरलच्या सहाय्याने तराफा बांधणे तसेच जीवरक्षक लाँचमधून पाण्यातील बचावकार्य करणे आदी बाबींविषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर प्रत्यक्ष सहभागी शिबिरार्थींनीकडून सराव करून घेतला. उद्यापासून चार दिवस उर्वरित संघांना प्रत्येकी एक दिवस याप्रमाणे जल आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 JUN 2017
पुण्यनगरी

# जलआपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणास सुरुवात



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामार्फत राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरांतर्गत राजाराम तलाव येथे जलआपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण घेताना विद्यार्थी.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'आव्हान २०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरात शनिवारपासून जलआपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणास सुरुवात करण्यात आली.

सकाळी आठ वाजता राजाराम तलावाच्या परिसरात भगव्या रंगाच्या 'पन्हाळा' चमूला प्रशिक्षण देण्यास राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) जवानांनी सुरुवात केली. निरीक्षक एस. डी. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी एक वाजेपर्यंत हे प्रशिक्षण चालले.

या प्रशिक्षणामध्ये सुरुवातीला संपूर्ण चमूचे तीन गटांत विभाजन करून त्यांना उपलब्ध साहित्यापासून बचावकार्य करणे, दोर व बॅरलच्या साहाय्याने तराफा बांधणे तसेच जीवरक्षक लाँचमधून पाण्यातील बचाव कार्य करणे आदी बाबींविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्यक्ष सहभागी शिबिरार्थींनाच या सर्व गोष्टी करावयास लावण्यात आल्या.

सोमवारपासून चार दिवस उर्वरित संघांना प्रत्येकी एक दिवस याप्रमाणे जलआपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

4 JUN 2017

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात गूळ गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा स्थापन होणार

## डॉ. अनिल काकोडकर यांच्या उपस्थितीत निर्णय

प्रतिनिधी, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठात** गूळ गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा तत्त्वतः निर्णय विद्यापीठात झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत घेण्यात आला. ज्येष्ठ शास्त्रज्ञ व महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. अनिल काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. ही माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकाराने राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग (आरजीएसटीसी) यांच्या सहकार्याने कोल्हापुरी गुळाच्या संदर्भात विविध बाजूंनी विचारविमर्श करण्यासाठी ही विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. शिवाजी विद्यापीठात गुळाच्या अनुषंगाने संशोधन, प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, प्रक्रिया विकास याविषयी आधुनिक तंत्रज्ञानाधारित गुऱ्हाळाचा पथदर्शी प्रकल्प उभारण्याचा निर्णय या बैठकीत झाला. त्यासाठी आरजीएसटीसी सर्वतोपरी सहकार्य करेल, असे डॉ. काकोडकर यांनी आश्वस्त केले.

सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे (आयसीटी) कुलगुरू पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांनी टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे पूर्णवेळ सहभाग घेऊन मार्गदर्शनही केले. यादव म्हणाले, कोल्हापुरी गुळाचा दर्जा व चव कायम राखण्याबरोबरच त्याची योग्य प्रतवारी करण्याकडेही आमचा कटाक्ष राहील. कोल्हापुरी गुळाच्या योग्य ब्रँडिंगसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकसनाला पर्याय नाही.

आयआयटी (मुंबई) यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा विकास व विस्तार यावर नजीकच्या काळात भर देण्याची गरज आहे, तसेच आयसीटी (मुंबई) यांच्याकडून गूळ व गूळ पावडर यांची दर्जानिश्चिती व तंत्रज्ञानविषयक प्रकल्पाचे काम सहा महिन्यांत पूर्ण करावे, अशी अपेक्षाही डॉ. काकोडकर यांनी व्यक्त केली.

या वेळी झालेल्या चर्चेत ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या पणन विभागाचे निवृत्त संचालक दिनेश ओहोळकर, प्रा. नरेंद्र शहा, प्रा. बी. एन. थोरात, वारणानगर टीकेआयईटीचे प्रा. एस. व्ही. अणेकर, दीपक गुप्ते, अनिकेत जोशी, डॉ. ए. व्ही. सप्रे, अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील, प्रा. ए. एम. गुरव, आरजीएसटीसीचे विद्यापीठ समन्वयक प्रा. एस. आर. पाटील, श्री छत्रपती शाहू सहकारी गूळ खरेदी-विक्री संघाचे राजाराम पाटील, शेतकरी प्रतिनिधी शिवाजी पाटील, बाळासाहेब पाटील आदींनी सहभाग घेतला. जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या प्रा. ज्योती जाधव यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2017
पुढारी

# आवड, कल लक्षात घेऊनच अभियांत्रिकीला प्रवेश घ्या

## डॉ. जय बागी; अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेवर मार्गदर्शन व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी प्रवेश हा अलीकडे कुटुंबातील गंभीर विषय बनला आहे. मुलांकडून पालकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. पाल्यावर अपेक्षांचे ओझे न लादता त्यांची आवड, कल लक्षात घेऊनच अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची शाखा निवडण्यास पालकांनी मदत करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग व दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे अध्यक्ष प्रा.डॉ. जय बागी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग, दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सच्या संयुक्त विद्यमाने 'अभियांत्रिकीशिक्षणातीलकरिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१७' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. डॉ. बागी म्हणाले, परदेशातील शिक्षण हे एज्युकेशन परचेस सिस्टीम आहे. शिक्षणातील अभ्यासक्रम निवडण्याचे विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य आहे. भारतात मात्र आजही विद्यार्थी बहुतांशी पालकांवर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत अभियांत्रिकीसह इतर अभ्यासक्रमाला प्रवेशासाठी अडचणी निर्माण होतात. विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन ठेवून शाखा निवडली पाहिजे. एस.बी.चव्हाण 'इलेक्ट्रॉनिक्स व कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी', डॉ. आर.जे.देशमुख 'कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी', डॉ. पी.डी.पाटील 'केमिकल इंजिनिअरिंग', एस.बी. काळे 'मॅकेनिकल इंजिनिअरिंग', महेश साळोखे 'सिव्हिल इंजिनिअरिंग', इराण्णा वूडचंद 'फूड टेक्नॉलॉजी', पी.जे. पाटील 'नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी', अजय देशपांडे 'अॅग्रीकल्चर इंजिनिअरिंग', बलराम महाजन 'आर्किटेक्चर' विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर पी.पी. प्रभू यांनी केंद्रभूत अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. स्वागत इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे मानद सचिव अजय देशपांडे यांनी केले. आभार अमृता मांजरेकर यांनी मानले.



**कोल्हापूर : व्याख्यानप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. जय बागी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E 4 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठ पदवीधर नोंदणीला सुरुवात

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार पदवीधर मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात ऑनलाइन पद्धतीने शुक्रवारपासून सुरुवात झाली. मतदारयादीत नाव समाविष्ट होण्यासाठी २७ जूनपर्यंत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभेवर पदवीधर मतदारसंघातून दहा जागांची निवडणूक घेण्यात येणार आहे. या प्रक्रियेत भाग घेण्यासाठी पदवीधर मतदरयादीत नाव समाविष्ट असणे अनिवार्य केले आहे. ज्या पदवीधरांनी २६ जून २०१५ ते ३० जुलै २०१५ मध्ये नोंदणी केली आहे, त्यांना पुन्हा नोंदणी करावी लागणार नाही.

पदवीधर मतदारयादीमध्ये नाव समाविष्ट होण्यासाठी विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर University Election 2017 या लिंकवर ऑनलाइन पद्धतीने भरावा लागणार आहे. संकेतस्थळावर २० रुपये शुल्कासह अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे विद्यापीठाके सादर करावी लागणार आहेत, त्यानंतरच या मदारयादीमध्ये नाव समाविष्ट होणार आहे. नाव नोंदणी करताना पदवी प्रमाणपत्रांची छायांकित प्रत, निवासाचा पुरवा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालक परवाना, शिधापत्रिका), शुल्क भरलेल्या पावतीची सक्ती केली आहे. निवडणुका विविध मतदान केंद्रावर घेण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या नवीन कायद्यानुसार कॉलेज प्रतिनिधी व अधिसभेसाठी मतदान होणार असल्याने सर्वच राजकीय विद्यार्थी संघटनांनी नाव नोंदणीसाठी मोहीम हाती घेतली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने पदवीधरांना मेळावा घेऊन मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे.